# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १६/०६/२०२६ (मंगळवार )

## पोलीस स्टेशन रामटेक अंतर्गत किंग रेस्टॉरंट अँड लॉजिंग मध्ये वेश्या व्यवसाय चालविणाऱ्यावर गुन्हा नोंद, एका पिडीतेची सुटका, रामटेक पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन रामटेक :—** दिनांक १५/०६/२०२६ रोजी रामटेक पोलीसांना गुप्त बातमीदारकडुन खात्रीशीर माहिती मिळाली की, **पोलीस ठाणे रामटेक परिसरामध्ये विशाल प्रकाशसिंग सोलंकी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता महिला व मुलीनां पैशांचे आमिष देवून देहव्यापारास प्रवृत्त करून किंग रेस्टॉरंट अँड लॉजिंग किड्स कॉलेज रोड, रामटेक येथे लोकांकडून पैसे घेवुन अवैधरित्या कुटंनखाना चालवुन देहव्यापार करवुन घेत आहे.** रामटेक पोलीसांनी **किंग रेस्टॉरंट अँड लॉजिंग ,रामटेक** येथे धाड टाकली असता **आरोपी विशाल प्रकाशसिंग सोलंकी, वय ४५ वर्ष, रा. आझाद वार्ड रामटेक, ता. रामटेक, जि. नागपुर हा मिळुन आला. त्याला लॉज मालकाबाबत विचारपुस केली असता तो स्वत: मालक असल्याबाबत माहीती प्राप्त झाली.** पोलीसांनी पंचासमक्ष हॉटेल ची पाहणी केली असता नमुद हॉटेल मध्ये खोली क्रं १ मध्ये एक पिडीत महीला मिळुन आली. आरोपी हे स्वत:च्या आर्थिक फायदयाकरिता नमुद महीलेला पैश्यांचे आमिष देवून देहव्यापार करण्यास प्रवृत्त करून जागा उपलब्ध करून देवुन तिच्याकडुन देहव्यापार करवुन घेत असल्याची माहीती पिडीतेने पोलीसांना दिली.

**पोलीसांनी घटनास्थळावरून ०१ अँड्रॉईड मोबाईलसह ,रोख रक्कम ५८० /— रूपये, आणि इतर साहीत्य असा २१,२३०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच मिळुन आलेल्या पिडीतेची सुटका करण्यात आली आहे. आरोपी विशाल प्रकाशसिंग**

सोलंकी, वय ४५ वर्ष, रा. आझाद वार्ड रामटेक, ता. रामटेक, जि. नागपुर यांच्या विरूद्ध पोस्टे रामटेक येथे कलम ३,४,५, ७ स्त्रीया व मुली अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे.



# अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ०६ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, दुचाकी,६ मोबाईल सह १ लाख १७ हजार ५० रूपयांचा मुद्देमाल जप्त नरखेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन नरखेड** :— दिनांक १४/०६/२०२६ रोजी नरखेड पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा पिलापुर मातामाय मंदिर समोर नरखेड येथे काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे नरखेड पोलीस घटनास्थळी पोहचले असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) दुष्यंत पूरणदयाल पालीवाल, वय ३८ वर्ष, रा. राणी दूर्गावती वार्ड, पांढुर्णा (म.प्र ) , २) प्रकाश प्रेमलाल कसलीकर, वय ३५ वर्ष, रा. भवाणी माता वार्ड, पांढुर्णा (म.प्र) ३) विलास रामनाथ चव्हाण, वय ४५ वर्ष, रा. वार्ड क्र. ०४, बेलोना, ता. नरखेड ४) सुनिल गुलाबसींग नेनावत, वय ३५ वर्ष, रा.वार्ड क्र ०४, बेलोना, ता. नरखेड ५) अशोक गोकल बनाफर, वय ३६ वर्ष, रा. वार्ड क्र. ०४, बेलोना, ता. नरखेड ६) चंदन भुराजी सनबनिया, वय ३१ वर्ष, रा. पिलापुर, ता. नरखेड** यांना ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना जागीच पकडले. पोलीसांनी घटनास्थळावरून ५२ तास पत्ते आणि रोख रक्कम ५०००/—रूपये, वेगवेगळया कंपनीचे ०६ अॅड्रॉईड मोबाईल किंमती ४२,०००/—रूपये, ०१ मोपेड वाहन असा एकुण १,१७,०५०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात **आला आहे.**

**नमुद ०६ आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन नरखेड येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**



# अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०७ गुन्हे नोंद

दिनांक १५/०६/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन मोहाफुल दारू, देशी दारू, मोहाफुल रसायन सडवा असा एकुण ५३,७६०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण ७ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी नामे १) संदिप पंजाबराव कुमरे, वय ३२ वर्षे, रा. चौरखैरी, ता. नरखेड, जि. नागपुर २) मनोहर तुळशिराम भलावी, वय ५५ वर्षे, रा. चौरखैरी, ता. नरखेड, जि. नागपुर ३) महिला आरोपी यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन देवलापार येथे** आरोपी रामेश्वर मारूती खंडाते, वय ४४ वर्ष, रा. टांगला, ता. रामटेक, जि. नागपुर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन रामटेक** येथे आरोपी नामे नाव आशिष अशोक रामेलवार, वय ३६ वर्ष, रा. नगरधन, ता. रामटेक याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन अरोली** येथे आरोपी नामे १) विजेंद्र वसंता मेश्राम, वय ४० वर्षे, रा. विरशी, ता. मौदा २) संदिप गोपाळा वैदय, वय ३६ वर्षे, रा. धानला, ता. मौदा जि. नागपूर यांचेवर प्रत्येकी ०१ असे ०२ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

**नमुद कारवाईत एकुण ३९६० मिली देशी दारू, १०० लिटर मोहाफुल दारू, १२०० लिटर मोहाफुल सडवा असा एकुण ५३,७६०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

# नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ७७८ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक १६/०६/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २३ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ७७८ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे ३१ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३३ आरोपी अशा एकुण ९५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ४८ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २८ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २३ आणि पोलीस स्टेशन वेलतुर ३२ आरोपी पोलीस स्टेशन पाचगाव १२ आरोपी अशा एकुण १४३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ६६ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३६ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३० आरोपी अशा एकुण १६१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३१ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे २० आरोपी पोलीस स्टेशन वडोदा येथे १९ आरोपी अशा एकुण ७० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ४४ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३२ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २८ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे २६ आरोपी अशा एकुण १३० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ५८ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ५२ आरोपी

आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३९ आरोपी अशा एकुण १७९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**(सर्व ६ उपविभागातील सर्व २३ पोलीस स्टेशन येथे एकुण ७७८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे. )**





मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने